




कलेविना आपले जगणे अशक्य आहे. मूलभूत गरजा भागले की मनुष्यप्राणी जीवन जगण्यासाठी कलेची जोड घेत असतो. आदिमानवापासून चित्र शिल्प वास्तू याचे मनुष्य जीवनात समावेश असल्याचे विशेष अवशेष आपणास पाहावयास मिळतात. आपल्या शाळेतही आपल्या शिक्षक वृंद मुलांना फक्त कला करण्याच्या अट्टहास न धरता त्याला एक प्रशिक बनवण्याचा प्रयत्न करतो. याकर्त्या मुलांना कला म्हणजे काय व त्याचा आपल्या दैनंदिन जीवनात वापर कसा करायचा या गोष्टीकडे लक्ष दिले जाते. कलेमुळे मुलांच्या सृजनात्मक शक्तीचा विकास होतो. निरीक्षण शक्ती सुधारते एकाग्रता वाढते तसेच कलेमुळे स्वतःच्या भावना मानण्याची त्याला मुलांमध्ये रुजते. त्यामुळे मुलांची एक नवीन अशी ओळख निर्माण होते आपल्या शाळेत प्रत्येक वर्षी मुलांकडून वेगवेगळ्या कलात्मक वस्तू चित्र शिल्प यांचे अनेक नमुने शिकून ते मुलांकडून करून घेतले जातात. मुलांच्या वयोगटानुसार तसेच आकलन शक्तीनुसार त्याचा अभ्यासक्रम आखला जातो. तसेच शाळेच्या प्रत्येक कार्यक्रमासाठी तयार करण्यात स्कूल डेकोरेशन येणाऱ्या स्टेज डेकोरेशन तसेच वेगवेगळे देखावे. (संक्रात, गुढीपाडवा,होळी, दिवाळी,नवरात्र, गणपती, कृष्ण जन्माष्टमी )मुले अगदी उत्साहात करतात तसेच प्रत्येक वर्षी वेगवेगळ्या स्पर्धेत उत्साहाने सहभागी होऊन यश मिळवतात. त्यामध्ये कॅम्पस क्लब कला उत्सव फजले अब्बास नवनीत ड्रॉइंग कॉम्पिटिशन बालकुमार चित्रकला स्पर्धा अशा अनेक स्पर्धांमध्ये भाग घेऊन यश मिळवतात. चित्रकला स्पर्धेमध्ये इंद्रधनु, एलिमेंट्री, इंटरमीडिएट ग्रेड परीक्षा करता विद्यार्थ्यांना बसवले जाते तसेच यात उत्तीर्ण होऊन मुळे यश मिळवतात. तसेच चित्रकला प्रदर्शनाचे आयोजन करून यामध्ये होणाऱ्या चित्राच्या विक्रीपासून सेवा योजनेअंतर्गत येणारी रक्कम देणगी म्हणून दिली जाते. रांगोळी स्पर्धा पोस्टर मेकिंग स्पर्धा डेकोरेशन अशा वेगवेगळ्या विषयावर स्पर्धा घेण्यात येते . आमच्या शाळेतील विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली ५ फूट ६ इंच उंचीची नटराजाची शिल्प ९ वी व १० वीच्या विद्यार्थ्यांनी बनवली. तसेच १० वी मधील विद्यार्थी प्रत्येक वर्षी आपल्या वर्गाच्या बाहेर भिंतीवर चित्र रेखाटून रंगकाम करतात. यामध्ये महाराष्ट्रातील किल्ले व भौमितिक आकाराची सांगत व यावर्षी छत्रपती संभाजीनगर मधील दरवाजे रेखाटणार आहेत. थोडक्यात आमच्या शाळेत मुलांना एक चांगला नागरिक घडवण्याच्या दृष्टीने सर्वांगीण विकासाकडे लक्ष देण्यात येते.




vivo V19
Perfect Shot
2024.07.22 10:21






vivo V19
Perfect Shot
2024.07.22 09:19



